# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि-रायगड -४१०२०६**

**ईमेल पत्ता: jtdire.१११५@gmail.com Website: http://jdhepanvel.org दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४६१४२०**

जा.क्र.विससं/उशि/कोविप/वेतनपथक/तासिका मानधन/२०२५-२६/ दिनांक :०९/१०/२०२५

प्रति,
कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ , मुंबई

**विषय:- तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीस मान्यता देऊन विहीत वेळेत मानधन अदायगीबाबत ...**

संदर्भ:- १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१८१/२१/विशी-१, दि.१७.१०.२०२२
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.अर्थसं-२०२२/प्र.क्र.१०५/(१)/मशि-३, दि.२७.०३.२०२३
३. शिक्षण संचालनालय पुणे, यांचे पत्र क्र. उशिसं/२०२५/सीएचबी/मवि-१/E-Comp.No.२११६४४८, दि.३०.०८.२०२५
४. प्रस्तूत कार्यालयाचे पत्र क्र.विससं/उशि/कोविप/तासिका मानधन/२०२५-२६, दि,०८.०९.२०२५
५. प्रस्तूत कार्यालयाचे पत्र क्र.विससं/उशि/कोविप/तासिका मानधन/२०२५-२६, दि,०९.०९.२०२५
६. शिक्षण संचालनालय पुणे, यांचेकडील परिपत्रक उशिसं/२०२५/सीएचबी/मवि-१/E-Comp.No.२११६४४८, दि.०९.१०.२०२५

उपरोक्त विषयाबाबत, शैक्षणिक वर्ष सुरु होण्याच्या दिवसापासून तासिका तत्वावरील अध्यापकांच्या सेवा उपलब्ध होऊन शैक्षणिक कामकाज सुरळीतपणे पार पाडता यावे याकरीता तासिका तत्वावरील अध्यापकांची प्रत्येक करण्यासंदर्भात शासन निर्णय दि. १७.१०.२०२२ अन्वये कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये उपलब्ध कार्यभार निश्चित करणे, संबधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या स्तरावरुन ना-हरकत प्रमाणपत्र देणे, व्यवस्थापन स्तरावरील जाहिरात व निवड पध्दती व विद्यापीठ मान्यता याबाबींचा कालबध्द कार्यक्रम निश्चित करुन देण्यात आला आहे.

तथापि विद्यापीठांच्या स्तरावर तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीस मान्यता देण्याबाबतचे प्रस्ताव मोठया प्रमाणात प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे. मान्यतेअभावी संबंधीत महाविद्यालयाकडून मानधन अदायगीचे प्रस्ताव विभागीय सहसंचालक कार्यालयास सादर करता आलेले नाहीत. वरील पार्श्वभूमीवर आपणांस सुचित करण्यात येते की, विद्यापीठाच्या स्तरावर प्रलंबित असलेले तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीस मान्यता मिळणेबाबतचे प्रस्ताव तात्काळ निकाली काढण्यात यावेत.

**तसेच प्रस्तूत कार्यालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविदयालयातील तासिका तत्वावरील नियुक्त अध्यापकांच्या विदयापीठ मान्यतेकरिता विद्यापीठ स्तरावर झालेली कार्यवाही अहवाल सोबत जोडलेल्या विवरणपत्रात दि.१०.१०.२०२५ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत सादर करण्यात यावा.**

Signed by Kirankumar
Laxmanrao Bondar
Date: 10-10-2025 11:58:58

**(डॉ. किरणकुमार बोंदर)**
विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण,कोकण विभाग,पनवेल

प्रत : मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

F:/Harshada Darne/Letter

# विवरणपत्र

| विभागीय सहसंचालक, उ.शि कोकण विभाग, पनवेल अधिपत्याखालील तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीस मान्यता प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने विद्याठीने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि. ०९.१०.२०२५ | | | | |
|---|---|---|---|---|
| विद्यापीठाचे नांव | दि. ०९.१०.२०२५ अखेर विद्यापीठास प्राप्त एकूण प्रसताची संख्या | विद्यापीठाने मान्यता दिलेल्या प्रस्तावाची संख्या | विद्यापीठ स्तरावर प्रलंबित प्रस्तावची संख्या | प्रस्ताव प्रलंबित राहण्याची कारणे |
| मुंबई विद्यापीठ | | | | |

F:/Harshada Darne/Letter